दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार १६ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मनोज जरांगे यांच्या समर्थकावर जीवघेणा हल्ला, गंभीर दुखापत, भररस्त्यात दबा धरून



**वादळवार्ता/ गेवराई** मराठा आरक्षणासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून आंदोलन करत रान उठवणारे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकावर हल्ला झाला आहे. जरांगे यांचे समर्थक असलेले अमोल खुणे यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी दगडाचा वर्षावर करत हल्ला केला. या हल्लामध्ये अमोल खुणे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला जबर दुखापत झाली आहे. त्यांना तातडीने उपचारांसाठी गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोमवारी रात्री ही घटना घडली. खुणे यांच्यावर हल्ला केल्यानंतर आरोपी तेथून तातडीने फरार झाले. खुणे यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती मिळताच हजारो समाज बांधवांनी त्यांच्यासाठी गेवराई रुग्णालयात धाव घेतली.मिळालेल्या माहितीनुसार, अमोल खुणे हे धानोरा गावचे रहिवासी आहेत. ते सुरूवातीपासून मनोज जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक आहेत. कोपर्डी अत्याचारातील आरोपीवर हल्ला केल्याप्रकरणी अमोल खुणे हे दोन वर्ष जेलमध्ये होते. जेलमधून बाहेर आल्यावर अमोल खुणे हे जरांगे पाटील यांच्यासोबत काम करत आहेत. सोमवारी रात्रीच्या सुमारास ते गेवराईहून आपल्या धानोरा गावी जात होते. मात्र तेवढ्यात रस्त्यातच दबा धरून बसलेल्या तीन-चार जणांनी अमोल खुणे यांच्यावर अचानक दगडफेक केली. त्या दगडफेकीमध्ये अमोल खुणे गंबीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला जबर मार लागला.ते जखमी अवस्थेतच रस्त्यावर उभे असताना तेथील काही स्थानिक नागरिक त्यांच्या मदतीसाठी पुढे धावले आणि त्यांनी खुणे यांना उपचारांसाठी गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात तातडीने दाखल केलं. अमोल खुणे यांचा मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनावरूनच त्यांच्यावर हल्ला झाल्याचा दावा मराठा बांधवांनी केला आहे. या दगडफेकीनंतर हल्लेखोर फरार झाले असून त्यांचा कसून शोध घेण्यात येत आहे.

## वसुंधरा ग्रुप व समृद्धी ग्रुप च्या वतीने महिला सक्षमीकरणासाठी मोफत व्यवसाय ट्रेनिंग

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/ पंकज भंडारी**



वसुंधरा ग्रुप व समृद्धी गृप यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सक्षमीकरण व आर्थिक सबलीकरणासाठी मोफत व्यवसाय ट्रेनिंग मराठा चेंबर्स येथे आयोजित केले होते. या ट्रेनिंगसाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रॉपर्टी व लॅन्ड व्यवसायात प्रामुख्याने पुरुषवर्ग काम करताना दिसतात. या व्यवसायात महिलांनी पण सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवावे या उद्देशाने समृद्धी ग्रुपचे ओनर नितीन मोरे व सुनील निकम यांनी महिलांना कमीत कमी वेळात जास्त उत्पन्न कसे मिळवता येईल याचे मार्गदर्शन केले. यावेळेस गायक मुर्तुजा यांनी अप्रतिम गाणी सादर केली तर मिमिक्री आर्टिस्ट मनोज चण्णा यांनी विविध पक्षांचे आवाज काढून मनोरंजन केले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध वास्तूतज्ञ अखिलेश राजगुरू, पशुप्रेमी अनिल साळवी, सामाजिक कार्यकर्त्या मिलन पवार, सचिन मोरे व फिल्म डिरेक्टर शैलेंद्र निर्मळे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन वसुंधरा ग्रुपच्या संस्थापिका योगिता गोसावी यांनी केले होते.

## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळीच्या विद्यार्थ्याने केंद्र सरकारच्या शिष्यवृत्ती परीक्षेत गाठले यशोशिखर

**वादळवार्ता/परळी** पीएम यशस्वी टॉप क्लास स्कूल एज्युकेशन स्टुडंड्स आयोजित प्रतिष्ठित शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होत चि.आविष्कार सातभाई या विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. हे घोषित करताना आम्हाला खरोखर आनंद होत आहे.की, त्याच्या पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती म्हणून त्याला ७५,००० ची रक्कम प्राप्त झाली आहे. दिल्ली वर्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने निरंतर वाटचाल करत असते. त्यातूनच त्यांना योग्य मार्गदर्शन, आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत असते.




यासाठी सतत आम्हाला विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषाताई किरण गित्ते यांचे योगदान लाभते.आमचे मार्गदर्शक श्री. किरण गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार यांचे मार्गदर्शन देखील वेळोवेळी लाभत असते .या यश प्रप्तीने आविष्कारने आपल्या आई वडील आणि शाळेचे दिल्ली वर्ड पब्लिक स्कूलचे तर आपल्या परळी परिसराचे नाव राष्ट्रीय स्तरावर नेले आहे. शालेय व्यवस्थापक अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते ,श्री किरण गित्ते साहेब, मुख्याध्यापक श्री. श्रीकांत पाटील सर व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले

## श्री कालिका देवीला आज सुवर्ण मुगुट समर्पीत

### साध्वी अनुराधा दिदी व महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे हस्ते!



**वादळवार्ता/शिरूर कासार** शिरूर कासार येथील कासार समाजाचे कुलदैवत तथा सकल भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री कालिकादेवीस सुवर्णमुगूट साध्वी अनुराधा दिदी व महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे हस्ते समर्पीत करण्यात येणार आहे . कै.रामभाऊ अंबुजी भांडेकर यांचे स्मरणार्थ भांडेकर परिवाराच्या संपल्पनेतून सुवर्ण मुगुट चढवला जाणार आहे, कै.मारुती भांडेकर ,कै. वसंत भांडेकर कै.दामोधर भांडेकर आणि मुरलीधर भांडेकर व नामदेव भांडेकर यांच्या परिवाराकडुन आपल्या कुलदैवताला सुवर्ण मुगुट समर्पीत करण्यात येणार आहे . मंगळवारी प्रतीवर्षाप्रमाणे अष्टमी नवमी देवीचा प्रगटदिन साजरा होत असतो छबीना व आराधना देखील होत असतात ,मंगळवारी याच मुहूर्तावर कालिकादेवीच्या ऐश्वर्यात सुवर्ण मुगुट भर घालणार आहे .संस्थानची भौतीक प्रगतीचा एक भाग म्हणून नव्याने दगडी भव्य महाद्वाराचे काम देखील सुरू आहे . या कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संखेने उपस्थित राहवे असे आवाहन अखिल भारतीय सोमवंशीय कासार समाजाचे अध्यक्ष शरद भांडेकर व श्री कालिकादेवी संस्थानचे विश्वस्थ अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील यांनी केले आहे . सुवर्ण मुगुट समर्पण विधी नंतर पंचाच्या आराधना ढक्कु भाकरीचा प्रसाद दिला जाणार आहे . तेव्हा या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भांडेकर परिवार व श्री कालिका देवी संस्थानचे अध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर उपाध्यक्ष गोविंद पाटील सचिव बापूराव गाडेकर व सर्व विश्वस्तांनी

## अक्षता सुळेला एमबीबीएस पदवी प्रदान



**वादळवार्ता/पिंपळवंडी** कु.अक्षता आजिनाथ सुळे ही लहानपणापासून अतिशय हुशार, शांत,संयमी व जिद्दी मुलगी तिचे पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण जि.प.प्रा.शा.जरेवाडी केंद्र पिंपळवंडी ता.पाटोदा या ठिकाणी अतिशय दुर्गम भागातल्या शाळेत व खूप छोट्या खेड्यात झाले. शाळा ग्रामीण भागातील व लहान असली तरी अक्षताची स्वप्न मात्र खूप मोठी व समृद्ध होती.तिचे माध्यमिक शिक्षण ही खेड्यातच म्हणजेच श्री.गणेश विद्यामंदिर अंमळनेर ता.पाटोदा या शाळेत झाले.पुढे नीटचा अभ्यास केला व डॉक्टर वैशंपायल गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज सोलापूर या महाविद्यालयात एमबीबीएस साठी प्रवेश मिळवला. पुढील पाच वर्ष कठोर परिश्रम करून व कोरोना काळ असताना स्वतः घरी अभ्यास करून तिने एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. दोन दिवसापूर्वी महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात तिचा व तिच्या पालकांचा सत्कार करून तिला एमबीबीएस पदवी प्रदान करण्यात आली. अक्षताच्या यशाबद्दल पिंपळवंडी व अंमळनेरचे आजी-माजी सरपंच, उपसरपंच,सदस्य,शिक्षक,पत्रकार, ग्रामस्थांच्या वतीने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पाटोदा तालुक्यातील निवडुंगा येथील रहिवासी व अंमळनेर येथे स्थायिक झालेले जरेवाडी जि.प.शाळेचे सहशिक्षक आजिनाथ सुळे यांची कु.अक्षता ही कन्या आहे.

## अंबासाखर कारखाना खून प्रकरणी पोलिसांनी घेतले दोघांना ताब्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई परवेज पटेल**

अंबाजोगाई तालुक्यातील अंबासाखर कारखाना खून प्रकरणातील दोघांना अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बोलावून घेऊन युवकाचा तिक्ष्ण हत्याराने वार करत निघृण खून केल्याची घटना दि.14 एप्रिल रोजी रात्री घडली होती. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून वशीम खान अब्जल खान पठाण व प्रमोद सोळंके यांना ताब्यात घेतले आहे. अंबाजोगाई शहरापासून काही अंतरावर असलेल्या अंबासाखर कारखाना उड्डाण पुलाच्या खाली बोलावून घेऊन खून करण्यात आला होता. संजय आत्माराम राठोड (वय 35, रा. पोरेगाव तांडा, जिल्हा लातूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. संजय राठोड हा ऊसतोड कामगार होता, तो सध्या अंबासाखर कारखाना येथे वास्तव्यास होता. राडी तांडा येथील तो जावई होता. त्याचे किराणा दुकान, चिकनचे दुकान आणि तो मत्स्य व्यवसाय देखील करत होता. काल दि.१४ एप्रिल रोजी संजय राठोड हा राडी तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यासाठी गेला होता तिकडून येऊन त्याने आंघोळ केली आणि आराम करत होता. तेवढ्यात त्याला एक फोन आला आणि तो गाडीवर बसून गेला. तो घरी परत आला नव्हता. अंबासाखर कारखाना उड्डाण पुलाच्या खाली संजय राठोड चा धारदार तिक्ष्ण हत्याराने छातीत, पोटात वार करून खून केला. घटनेची माहिती



मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामा पडवळ, यांनी तात्काळ पोलीस कर्मचाऱ्यांना सूचना देऊन घटनास्थळी पाठवले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठवला दरम्यान घटनेनंतर नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात जमा होऊन आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करत गोंधळ घातला. त्यांनतर वशीम खान अब्जल खान पठाण व प्रमोद सोळंके या दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान आता कोणत्या कारणासाठी खून केला याची माहिती समोर येणार आहे

संपादकीय

# भारतीय राज्यघटनेत लोकसभेची तरतूद!

[भारतीय प्रथम लोकसभा निवड दिन.]

लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकसभेचे सदस्य हे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. लोकसभेची निवडणूक ही भारतीय प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या मतदारसंघातून निवडून केली जाते. प्रत्येक लोकसभेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षाचा असतो. भारताची पहिली लोकसभा १९५१च्या सार्वजनिक निवडणुकीनंतर दि.१७ एप्रिल १९५२ रोजी अस्तित्त्वात आली. १९५७मध्ये ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर ती विसर्जित केली गेली. ही ज्ञानवर्धक माहिती अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी देत आहेत... संपादक.

आजच्या या लेखात आपण सांप्रत १७वी लोकसभा याबद्दलही संपूर्ण माहिती पाहणार आहोत. १७वी लोकसभा भारतामध्ये सद्या अस्तित्वात आहे. भारतासाठी कायदे करणाऱ्या संसदेचा आणि लोकशाही प्रशासन व्यवस्थेचा एक महत्वाचा भाग म्हणजे लोकसभा होय. लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ अनुसार तिची तरतूद केली आहे. तसेच धनविषयक प्रस्ताव हा तेथेच मांडला जातो. संसदेचे सभागृह या नात्याने तेथील सदस्यांचे प्रमुख कार्य- भारतीय राज्यघटनेच्या चौकटीशी सुसंगत असे कायदे बहुमताने बनवणे, हे असते. अर्थात हे सदस्य राज्यकारभाराच्या विधिमंडळ शाखेचे सदस्य आहेत.

प्रत्येक लोकसभेचा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षे असतो. त्यानंतर लोकसभेचे आपोआप विसर्जन होते व नव्या लोकसभेसाठी निवडणुका होतात. याला आणीबाणीची परिस्थिती हा एक अपवाद आहे. आणीबाणीची परिस्थिती जाहीर केल्यास तीचा कालावधी एक वर्षाच्या टप्प्यामध्ये ५ वर्षाहून अधिक काळही वाढवता येतो. लोकसभेस प्रथम सभागृह असेही म्हणतात. आपल्या भारत देशात राज्यागणिक मतदारसंघ आहेत. लोकसभा हा शब्द संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या पाठोपाठ निवडणुकांमधील कालावधीसही वापरतात. इ.स.२०१९पर्यंत भारतामध्ये १७ लोकसभा- कालावधी झाले आहेत. लोकसभेचे सदस्य हे जनतेने थेट निवडून दिलेले प्रतिनिधी असतात, अर्थात त्यांची भारताच्या पात्र प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या मतदारसंघांतून थेट निवडणूक केली जाते. भारताच्या राज्यघटनेप्रमाणे लोकसभेचे साधारणतः ५५२ सदस्य असतात. यामधील ५३० सदस्य भारताच्या राज्यांचे प्रतिनिधी, २०पर्यंत सदस्य हे केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी, तर २ सदस्य अँग्लो-इंडियन समाजाचे प्रतिनिधी असतात. जे की राष्ट्रपतीकडुन नामनिर्देषित केले जातात. पण १०४व्या घटनादुरुस्तीनंतर ही दोन पदे रद्द करण्यात आली आहेत.

लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकसभेचे सदस्य हे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. लोकसभेची निवडणूक ही भारतीय प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या मतदारसंघातून निवडून केली जाते. प्रत्येक लोकसभेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षाचा असतो. भारताची पहिली लोकसभा १९५१च्या सार्वजनिक निवडणुकीनंतर दि.१७ एप्रिल १९५२ रोजी अस्तित्त्वात आली. १९५७मध्ये ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर ती विसर्जित केली गेली. याप्रकारे भारतात १७व्या लोकसभेची निवडणूक इ.स.२०१९ रोजी झाली. त्यामध्ये मतदान ७ टप्प्यात पार पडले. मतदानाचा पहिला टप्पा हा दि.११ एप्रिल २०१९ रोजी पार पडला. दुसरा टप्पा हा दि.१८ एप्रिल २०१९ला झाला, तिसरा टप्पा हा २३ एप्रिलला पार पडला, चौथा टप्पा २९ एप्रिलला झाला, पाचवा टप्पा ६ मे रोजी झाला, सहावा टप्पा १२ मे रोजी आणि सातवा टप्पा हा १९ मेला झाला. अशाप्रकारे सतराव्या लोकसभेच्या निवडणुकीत सात टप्प्यात मतदान झाले. मतमोजणी दि.२३ मे २०१९ रोजी पार पडली. महाराष्ट्र राज्यात एकूण ४८ मतदार संघ होते. सांप्रत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे वाराणसी या उत्तर प्रदेशातील मतदारसंघातून निवडून आले होते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ अनुसार लोकसभेची तरतूद केली गेली आहे. ती लोकसभेच्या रचनेसाठी लागू आहे. लोकसभा आणि राज्यसभा या दोघींमध्ये काय फरक आहे? बघा- लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. हिची तरतूद ही भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१च्या अनुसार केली आहे. यामध्ये धनविषयक प्रस्ताव मांडला जातो. तिचा कालावधी हा जास्तीत जास्त पाच वर्षाचा असतो. त्यामध्ये येणारे सदस्य हे लोकांमार्फत निवडून येतात. तर राज्यसभा हे भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. तिची तरतूद ही भारतीय राज्य घटनेच्या कलम ८०च्या अनुसार केली आहे. तिचा कालावधी हा सहा वर्षाचा असतो. सहा वर्षाचा कालावधी असूनही येथे दर दोन वर्षांनी काही सदस्य निवृत्त होऊन त्या जागी नवीन सदस्य येतात. यामध्ये येणारे सदस्य हे राज्यांच्या विधानसभेने निवडून दिलेले असतात.

निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेमध्ये काही महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले होते, ते मुद्दे असे होते- सन २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये नव्वद कोटी इतके लोक म्हणजेच मतदारांनी मतदान केले. सन २०१४च्या तुलनेत यावेळी सात कोटी इतके मतदार वाढले होते. पहिल्यांदाच त्यात अठरा- एकोणीस वर्षे वयाच्या दीड कोटी मतदारांनी मतदान केले. आठ कोटी त्रेचाळीस लाख इतक्या नवीन मतदारांनी या निवडणुकीत मतदान केले. असेही निवडणूक आयुक्तांनी माहिती दिली होती, की ईव्हीएम- इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनच्या सुरक्षेसाठी सुद्धा काटेकोर नियम पाळत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता व ईव्हीएमचे जीपियस ट्रॅकिंग करण्यात आले होते. मतदार यादीमधे आपले नाव आहे की नाही? हे पाहण्यासाठी निवडणूक आयोगाने हेल्पलाईन नंबर दिला होता. या हेल्पलाईन नंबरवर फोन करून खात्री पटवून घ्यावयाची होती.

# सर्व कार्यकर्त्यांनी प्रभू श्रीरामचंद्रजींचा आदर्श घ्यावा!

(श्रीराम नवमी: प्रभू श्रीरामचंद्र जन्मदिन विशेष.)

भगवान विष्णूंचा सातवा अवतार असणाऱ्या प्रभू श्रीराम यांचा जन्म चैत्र शुद्ध नवमी रोजी दुपारी १२ वाजता झाला. श्री राम नवमीचा सण दरवर्षी मोठ्या आनंदात साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, राम नवमी हा हिंदू धर्मातील शुभ सणांपैकी एक आहे. हा सण चैत्र नवरात्रीच्या नवव्या दिवशी साजरा केला जातो.

चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले प्रभू श्रीराम यांचा जन्म झाला, अशी मान्यता आहे. हा दिवस श्री रामनवमी म्हणून साजरा करतात. श्रीराम नवमीला दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर- दुपारी १२:०० वाजता रामजन्माचा सोहळा होतो. श्रीरामाच्या मूर्तीला पाळण्यात घातले जाते. श्री रामांच्या चित्रास वा मूर्तीस इतर हारांसमवेतच गाठीपण घालतात. श्री रामांची पूजा करताना त्याना करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने गंध लावतात. तसेच श्रीरामांना हळद-कुंकू वहातांना आधी हळद अन् नंतर कुंकू, उजव्या हाताच्या अंगठा आणि अनामिका यांच्या चिमटीत घेऊन चरणांवर वाहतात. श्रीरामांना केवडा, चंपा, चमेली अन् जाई ही फुले वाहतात. त्यानंतर आरती करून प्रसाद वाटतात. रामजन्माच्या दिवशी साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवांत रामजन्माचा पाळणा अवश्य म्हटला जातो.

"श्रीराम जन्मला गं सखे;
श्रीराम जन्मला !!

श्रीराम नवमीच्या दिवशी मठ-मंदिरात भजन, पूजन, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम करून हा जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. काही ठिकाणी तर गुढीपाडवा ते श्रीराम नवमी या काळांत रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे गायन वगैरे कार्यक्रमही केले जातात. श्रीराम हे सर्व आबालवृद्धांची लाडकी देवता असल्यामुळे सर्व लहान थोर मंडळी या उत्सवात सहभागी होतात.

हिंदू धर्मग्रंथानुसार त्रेतायुगातील रावणाचे अत्याचार संपवण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवान विष्णूने मृत्यूच्या जगात- मृत्यूलोकात श्रीराम म्हणून अवतार घेतला. प्रभू श्रीरामचंद्रजींचा जन्म चैत्र शुक्ल नवमीला राणी कौशल्याच्या पोटी पुनर्वसु नक्षत्रात आणि कर्क राशीत राजा दशरथाच्या घरी झाला. रामायणानुसार अयोध्येचा राजा दशरथ याला तीन बायका होत्या, परंतु फार काळ राजा दशरथला संततीचे सुख कोणीही देऊ शकल्या नाही, त्यामुळे राजा दशरथ खूप अस्वस्थ असायचे. पुत्रप्राप्तीसाठी राजा दशरथ यांना वशिष्ठ ऋषींनी पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याची कल्पना दिली होती. यानंतर राजा दशरथाने आपल्या जमाई महर्षी ऋषिश्रृंगासोबत यज्ञ केला. त्यानंतर यज्ञकुंडातून एक दैवी पुरुष हातात खीरीची वाटी घेऊन बाहेर आला. यज्ञ संपल्यानंतर महर्षी ऋषीश्रृंगाने दशरथाच्या तीन पत्नींना खीरीची वाटी खायला दिली. खीर खाल्ल्यानंतर काही महिन्यांनी तिन्ही राण्या गरोदर राहिल्या. बरोबर ९ महिन्यांनंतर राजा दशरथाची ज्येष्ठ राणी कौशल्याने श्रीराम- भगवान विष्णूचा सातवा अवतार, कैकेयी यांनी भरत आणि सुमित्रा यांनी लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांना जन्म दिला. भगवान श्रीरामाचा जन्म दुष्ट प्राण्यांचा नाश करण्यासाठी पृथ्वीवर झाला होता.

संतशिरोमणी कबीर साहेबजी आदिरामाची व्याख्या स्पष्ट करतात, की आदिराम हा अविनाशी देव आहे जो सर्वांचा निर्माता आणि पालनकर्ता आहे. ज्याच्या एका इशाऱ्यावर पृथ्वी आणि आकाश कार्य करतात, ज्याच्या स्तुतीमध्ये तेहतीस श्रेणी देवी-देवता नतमस्तक होतात. जो पूर्णपणे मोक्षदाता आणि आत्मस्वरूप आहे. भारतभर श्रीरामजन्म हा चैत्र शुक्ल नवमीला झाला असे समजले जात असले तरी, ज्या अयोध्येत रामाचा जन्म झाला, त्या अयोध्येतील वैश्य समाज श्रीरामाचा जन्म मार्गशीर्ष महिन्यातील पंचमीला झाला, असे मानतात. त्या पंचमीला अगहन पंचमी म्हणतात. कारण मार्गशीर्षाला हिंदीत अगहन म्हणतात! याला आधार म्हणजे गोस्वामी संत तुळशीदासाच्या "रामचरित मानस" मधील पुढील उल्लेख-

"मंगल मूल लगन दिनु आया|
हिम रिपु अगहन मासु सुहावा||
ग्रह तिथि नखतु जोगु वर बारू|
लगन सोधि विधि कीन्ह विचारू||"



श्रीराम नवमी संपूर्ण भारतात साजरी केली जाते. तेलंगणातील भद्राचलम मंदिर हे अशा ठिकाणांपैकी एक आहे जिथे श्रीराम नवमी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. चैत्र नवरात्रीचीही समाप्ती श्रीराम नवमीच्या दिवशी होते. हिंदू धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामजींचा जन्म या दिवशी झाला होता, म्हणून भक्त ही शुभ तिथी पावन श्रीराम नवमी म्हणून साजरी करतात आणि पावन नद्यांमध्ये पवित्र स्नान करतात.

हिंदू कॅलेंडरनुसार श्रीराम नवमी हा सण चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी साजरा केला जातो. धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामांचा जन्म याच दिवशी झाला, म्हणून हा दिवस श्रीराम जन्मोत्सव म्हणून साजरा केला जातो. प्रभू श्रीरामचंद्रजींच्या जन्मोत्सवामुळे या तिथीला श्रीराम नवमी असे म्हणतात. भगवान रामाला विष्णूचा अवतार मानले जाते. भगवान विष्णूंनी पृथ्वीवरील राक्षसांना मारण्यासाठी त्रेतायुगात श्रीराम म्हणून मानव अवतार घेतला. प्रभू श्रीरामाला मर्यादा पुरुषोत्तम म्हटले जाते, कारण त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक संकटे सोसूनही प्रतिष्ठित जीवनाचे उत्तम उदाहरण मांडले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आदर्श सोडला नाही आणि जीवन सन्मानाने जगले. त्यामुळेच त्यांना सर्वोत्तम पुरुषाचे स्थान देण्यात आले आहे.

या दिवशी विशेषत: श्रीरामाची पूजा करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांचा जन्मोत्सव साजरा केला जातो. भगवान श्रीरामाचा जन्मदिवस संपूर्ण भारतभर उत्साहात साजरा केला जात असला तरी विशेषतः श्रीराम जन्मभूमी असलेल्या अयोध्येत हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. श्रीराम नवमीच्या वेळी अयोध्येत भव्य भक्तमेळा आयोजित केला जातो, ज्यामध्ये दूरदूरच्या भक्तांव्यतिरिक्त, भिक्षू आणि संन्यासी देखील पोहोचतात आणि श्रीराम जन्म साजरा करतात. सामान्यत: श्रीराम नवमीच्या दिवशी हिंदू कुटुंबांमध्ये उपवास, पूजा आणि इतर धार्मिक विधी आयोजित केले जातात. श्रीरामजींच्या जन्माच्या वेळी त्यांच्या जयंतीचे आयोजन करून त्यांचे जल्लोषात स्वागत केले जाते. अनेक घरांमध्ये विशेष सजावट केली जाते, घराला पवित्र करून कलशाची स्थापना केली जाते आणि प्रभू श्रीरामजींची पूजा करून भजन-कीर्तन केले जाते. विशेष म्हणजे या दिवशी श्रीराम, माता जानकी आणि लक्ष्मणजी यांचीही पूजा केली जाते.

माता कैकेयीने श्रीरामाचे वडील राजा दशरथ यांच्याकडून वरदान मागितल्यावर श्रीरामांनी राजवाडा सोडून १४ वर्षांचा वनवास आनंदाने स्वीकारला आणि वनवासात असतानांच अनेक राक्षसांसह अहंकारी रावणाचा वध करून सोन्याची लंका जिंकली. अयोध्या सोडताना माता जानकी आणि भाऊ लक्ष्मण हेही श्रीरामांसोबत १४ वर्षे वनवासात गेले. यामुळेच श्रीराम नवमीला श्रीरामांसोबत त्यांचीही पूजा मोठ्या भक्तिभावाने केली जाते. || सर्व भारतीयांना पावन श्रीराम नवमी निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा ||

**- संकलन व शब्दांकन -**
**संतचरणरज: बापू-श्रीकृष्णदास निरंकारी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**

# महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सामान्य ज्ञान परीक्षा उत्साहात संपन्न

## ग्रामीण विकास केंद्र व सनराईज कोचिंग क्लासेस चा स्तुत्य उपक्रम

**वादळवार्ता/शिरूर कासार**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ग्रामीण विकास केंद्र गोमळवाडा व सनराईज कोचिंग क्लासेस शिरूर कासार , स्टुडंट फेडरेशन स्वीकारावं इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने फुले,शाहु, आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आल्या यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्साहात सहभाग घेतला. या बाबत माहिती अशी की तालुक्यांतील विद्यार्थ्यांना महापुरुषांबद्दल माहिती व्हावी व त्यांनां परीक्षांचा अनुभव यावा या हेतूने ग्रामीण विकास केंद्र गोमळवाडा, सनराईज कोचिंग क्लासेस शिरूर व स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांचे जीवनावर व कार्यावर आधारीत सामान्य ज्ञान परीक्षा ग्रामीण विकास केंद्रचे अध्यक्ष समीर पठाण व सनराईज कोचिंग क्लासेस चे संचालक आत्तार सर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात सिद्धेश्वर मंदिराच्या सभागृहात



दिनांक ११ एप्रिल रोजी घेण्यात आल्या सदर परीक्षा ही ऑनलाइन पद्धतीने मोबाईवर घेण्यात आली त्यामूळे सहभागी विद्यार्थ्यांना नविन अनुभव मिळाला असल्याची आनंददायी प्रतिक्रीया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली या परीक्षेतील इयत्ता ९ वी ते १२ या मोठया गटातील यशस्वी विदयार्थी प्रिती अभिमान उगले, पृथ्वीराज बाळु उगले, शिवानी दत्ता गाडेकर व ईयत्ता ५ वी ते ८ वी या छोट्या गटातील यशस्वी विद्यार्थी शोएब शौकत आतार , श्रावणी संभाजी ढवळे, राजवर्धन बाळु उगले, संतोषी अविनाश गाडेकर यांचा सत्कार करण्यात येऊन त्यांना दत्तात्रय गाडेकर सर,सिंदफना अर्बन बँक, बीड जिल्हा स्वाभिमानी मुफ्टा शिक्षक संघटना,दिनेश गाडेकर, अमोल चव्हाण, नशिरभाई शेख यांचे वतीने रोख स्वरुपात बक्षिस वितरण करण्यात आले या कार्यक्रमास शिलाताई चव्हाण, योगिता गवळी, प्रविण गाडेकर, महादेव कातखडे सर,जितेश उगलमुगले बंटी सर, अशोक भांडेकर, यांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऍड अमृता परदेशी मॅडम, प्रा.आत्तार मॅडम,बिलाल सय्यद, समर्थ पवार, राजरत्न सोनवणे, सोहेल पठाण आदींनी परिश्रम घेतले

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिमनदरा (कोरडेवाडी) येथे आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**वादळवार्ता/केज** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्व भूषण, बोधिसत्त्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिमनदरा कोरडेवाडी येथे आंबेडकर जयंती अगदी उत्साहात साजरी करण्यात आली .कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेच्या आदर्श शिक्षिका सौ. शेळके मॅडम, मु.अ. श्री गायकवाड सर तसेच दै. पुण्य विचारचे केज तालुका प्रतिनिधी श्री पोपट राख उपस्थित होते. डॉ. आंबेडकर हे न्यायशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, राज्यघटनेचे शिल्पकार होते. यांनी अठरा पगड समाजाच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी, समाज उच्चाटन करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यांनी ‘ पीपल एज्युकेशन सोसायटीची’ स्थापना करून छत्रपती संभाजी नगर येथे मिलिंद कॉलेज आणि मुंबई येथे सिध्दार्थ कॉलेज ची स्थापना केली. बहुजन समाजासोबतच सर्व धर्म समभाव, अस्पृश्यता निर्मूलन, समानता, शिक्षणाचा मूलभूत अधिकार, मतदानाचा अधिकार मिळवून दिला. म्हणून आपण आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण करून आपल्या आचरणात आणले पाहिजे. या वेळी उपस्थित म्हणून विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित.

### वंचितचे अशोक हिंगे यांची समाज माध्यमावर बदनामी केल्या प्रकरणी जिल्ह्यातील अनेक जनावर गुन्हा दाखल

**वादळवार्ता/बीड** वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक भाऊ हिंगे पाटील यांच्या विषयी सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी करत असल्याचे निदर्शनास येताच वंचित बहुजन आघाडीचे ज्ञानेश्वर कवठेकर, युवा नेते अजय सरवदे, शेख युनूसभाई, विशाल बोबडे, राजेशकुमार जोगदंड, महिला जिल्हाध्यक्ष आनीताताई चक्रे, पुष्पताई तुरुकमाने, यांनी पोलीस अधीक्षक बीड यांची भेट घेतली व तक्रार दिली असता पोलीस अधीक्षक बीड यांनी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले असून 25 ते 30 जणांवर सायबर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे समाज माध्यमांचा वापर करताना कार्यकर्त्यांनी नेत्यांनी जाणीव पूर्वक कोणाची जर बदनामीकारक पोस्ट व्हिडिओ व्हायरल केले तर त्यावर गुन्हा होतो. जर बदनामी कारक पोस्ट व्हिडिओ टाकले तर प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी देखील अशा स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी शिष्टमळा बोलताना सांगितले. याप्रकरणी रितसर निवेदन देऊन कारवाई ची मागणी करण्यात आली होती त्यानंतर गुन्हा नोंद कारण्यात आला.

# कोण संजय राऊत, तुम्ही माझ्या क्वॉलिटीच्या लोकां बाबत प्रश्न विचारा:देवेंद्र फडणवीस यांनी राऊतांना डिवचले

**वादळवार्ता/सोयगाव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी भाजपचा जाहीरनामा जाहीर केला. त्या जाहीरनाम्याची माहिती देण्यासाठी भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी जाहीरनाम्यातील विविध तरतुदींची माहिती देताना त्यांनी माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले. श्रीकांत शिंदे फाउंडेशनमध्ये संशयास्पद आर्थिक व्यवहार होत आहेत, श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या कार्यासाठी ज्यांनी कोट्यावधी रुपये दिले ते दानशूर कोण? असे अनेक आरोप केले. याबाबत देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर फडणवीस यांनी राऊत यांना डिवचणारे उत्तर दिले.काय म्हणाले देवेंद्र फडणवीस संजय राऊत यांच्या आरोपांवर देवेंद्र फडणवीस यांना विचारल्यावर ते म्हणाले, कोण संजय राऊत? तुम्ही माझ्या क्वॉलिटीच्या लोकासंदर्भात प्रश्न विचारला. प्रश्न विचारताना माझा स्तर तरी पाहा, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. संजय राऊत यांच्या आरोपांवर बोलण्यास त्यांनी



स्पष्ट नकार दिला. ओबीसीसंदर्भात राहुल गांधी यांनी भाजपवर आरोप केले होते. भाजपने ओबीसींसाठी काय केले? असा प्रश्न राहुल गांधी यांनी केला होता. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी पलटवार केला. ते म्हणाले, “काँग्रेसने ओबीसींचा वापर केवळ मतपेटीसाठी केला. ओबीसींचे कल्याण केवळ भाजपने केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात सर्वाधीक ओबीसी मंत्री आहेत.”

देशाचे संविधान कोणीच समाप्त करु शकत नाही. विरोधकांकडे मुद्ये नाहीत, यामुळे भाजप संविधान बदलणार? असे आरोप ते करत आहेत. संविधानाची हत्या काँग्रेसनेच केली आहे. आणीबाणी लागू करुन संविधान संपवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. उलट पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी आल्यावर त्यांनी सर्वात प्रथम संविधानाची पूजा केली, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले..

# समान नागरी कायद्याचा संविधानाला नव्हे, आरएसएसला धोका; प्रकाश आंबेडकर यांचा मोठा दावा



**बीड/पाटोदा**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अकोला येथे आज पत्रकार परिषद घेऊन पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित केला. वंचित बहुजन आघाडीच्या जाहीरनाम्याचे वैशिष्ट्य म्हणजे आता NRC आणि CAA यांची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. ते पूर्णपणे असंविधानिक आहे. हा कायदा मुस्लिमांच्या विरोधात आहे असे दाखवले जात आहे. पण त्याचा सर्वांत मोठा परिणाम हा हिंदू समाजातील जुन्या काळात ज्यांना पेंढारी म्हटले जात होते आणि आता ज्याला VJNT आपण म्हणतो. त्यांना मोठ्या प्रमाणात याचा फटका बसणार आहे. भारतीय जनता पक्ष इथल्या हिंदू मतदारांना फसवत असल्याचे ॲड. आंबेडकर यांनी म्हटले आहे. NRC आणि CAA मुस्लिमांच्या विरोधात आहे. पण प्रत्यक्षात ते 20 टक्के हिंदू समाजाच्या विरोधात असल्याचेही या जाहीरनाम्यात म्हटले आहे. कंत्राटी कामगाराला 58 वर्षांपर्यंत निवृत्त करायचे नाही, असा धोरणात्मक निर्णय आम्ही घेतला आहे. शेतकऱ्यांसाठी हमीभावाचा कायदा आणि हमीभावाच्या कायद्याचे कोणी उल्लंघन करेल त्याला आर्थिक शिक्षेबरोबरच गुन्हेगारी शिक्षा देखील असेल असेही जाहिरनाम्यात नमूद करण्यात आल्याचे आंबेडकर यांनी सांगितले.शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी परदेशात जातो आणि तो अर्थव्यवस्थेवर बोजा आहे असे आम्ही मानतो. शिक्षण हे खासगी करून शिक्षण महर्षींनी कैदी केले आहे. या शिक्षण धोरणाला कैदेतून मुक्तता देत शिक्षणाबाबत सरकार आणि सार्वजनिक संस्था संमिश्र भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्रात शिक्षणावर फक्त 3 टक्के तरतूद आहे, राज्यात 5 टक्के तरतूद आहे. शिक्षण ही सर्वांत मोठी गुंतवणूक आहे. म्हणून त्याला 9 टक्क्यांपर्यंत घेऊन जाण्याचे आश्वासन आमच्या जाहीरनाम्यात असल्याचे आंबेडकर यांनी म्हटले आहे.सार्वजनिक क्षेत्र हे देशातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सध्या सार्वजनिक क्षेत्र विकण्याची प्रक्रिया चालली आहे, तिला आम्ही थांबवणार आहोत. नवीन औद्योगिक धोरण राबवणार आहोत, ज्यामुळे शेतीपूरक उद्योगांना प्राधान्य देण्यात येईल. आम्ही सत्तेत आल्यावर कापसाचा प्रती क्विंटल भाव किमान 9 हजार आणि सोयाबीनला 5 ते 6 हजार भाव दिला जाईल. शेतीला औद्योगिक दर्जा मिळावा या दृष्टीने आमचा जाहीरनामा सर्वसमावेशक आहे, असे त्यांनी नमूद केले.

# खा रजनीताई पाटील आणि बजरंग बप्पा सोनवणे यांची भेट !

वादळवार्ता/बीड राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या तथा राज्यसभा सदस्य खासदार सौ. रजनीताई अशोकराव पाटील यांची केज येथील “शिवनेरी” निवासस्थानी भेट घेवून त्यांचे आशिर्वाद घेतले. दि. १५ एप्रिल रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केज येथे काँग्रेस पक्षाच्या वर्किंग कमिटी सदस्य तथा खा सौ रजनीताई पाटील यांची त्यांच्या शिवनेरी निवस्थानी भेट घेवून त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, केजचे माजी नगराध्यक्ष आदित्यजी पाटील, काँग्रेसचे बीड जिल्हाउपाध्यक्ष राहूलजी सोनवणे, मा. नगरसेवक पशुपतीनाथ दांगट आणि काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



## परळी येथे अशोक हिंगे पाटील यांनी साधला संवाद वंचित उपेक्षित सारे एक होऊ सत्ता आपल्या हाती घेऊ - अशोक हिंगे

वादळवार्ता/परळी वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी संपूर्ण जिल्ह्यात संवाद दौरा सुरू केला आहे. आज दि.15 एप्रिल रोजी परळी येथे तालुका पदाधिकारी शहर पदाधिकारी यांची संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती.त्यांनी सर्व कार्यकर्त कामाला लागण्याच्या सूचना केल्या आहेत.या बैठकीत वंचित बहुजन आघाडीचे पूर्व विभागाचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, मिलिंद घाडगे,बबनराव वडमारे,अँड.अनिता चक्रे, पुष्पाताई तुरूकमाने,गौतम आगळे,भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष हनुमंत वाघमारे,प्रजावती कांबळे,अँड.संजय रोडे, प्रसन्नजीत रोडे,बाळासाहेब जगतकर,गौतम साळवे,गफार खान,संजय गवळी, नंदकुमार सावंत,प्रेम जगतकर,राजेश सरवदे प्रमोद रोडे,समाधान साळवे, ज्ञानेश्वर गित्ते,धम्मानद शिरसागर अमित सावंत, तालुका पदाधिकारी शहर पदाधिकारी सम्यक विद्यार्थी पदाधिकारी, भारती बौद्धमहासभा पदाधिकारी, वंचित बहुजन आघाडचे समर्थक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीचे अशोक हिंगे पाटील यांनी संवाद बैठक संपल्यानंतर शहरातील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या घरी भेटी गाठी दिल्या आहेत त्यामुळे मतदार मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पापक्षालन करण्याची याशिवाय दुसरी वेळ नाही: शरद पवार यांना कपिल पाटील यांचं पत्र; उद्याच निर्णय घेण्याचं आवाहन

**वादळवार्ता/बीड**

राज्यात महाविकास आघाडीकडून सर्व ४८ जागांचे वाटप जाहीर झाले आहे. परंतु सांगलीमधील जागेवरुन काँग्रेस आणि शिवसेनेत सुरु असलेला वाद मिटण्याची चिन्ह दिसत नाही. या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता आहे. सांगलीत महाविकास आघाडीच्या आघाडी धर्माला सुरुंग लागणार आहे. सांगलीतून सुरु झालेले बंडखोरीचे ग्रहण राज्यभर पसरण्याची भीती आहे. सांगलीत सोमवारी झालेल्या महाविकास आघाडीच्या मेळाव्याला काँग्रेस नेत्यांनी पाठ फिरवली. सांगलीत काँग्रेस नेते विशाल पाटील लोकसभा निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. त्यांनी अपक्ष बरोबरच दुसरा अर्ज काँग्रेस पक्षातर्फेही दाखल करणार आहे. सांगलीत काँग्रेस भवन समोर मेळाव्याच्या निमित्ताने विशाल पाटील शक्तिप्रदर्शन करणार आहेत. गणपती मंदिरासमोरून पदयात्रा काढून काँग्रेस भवनासमोर मेळावा होणार आहे. या मेळाव्यास जतमधील भाजपाचे नेते आणि माजी आमदार विलासराव जगताप येणार आहेत. या मेळाव्याला विशाल पाटील यांच्या व्यासपीठावर कोणकोण उपस्थित राहणार याकडे लक्ष लागले आहे. तसेच महाविकास आघाडी नेत्यांचे आजच्या विशाल पाटील यांच्या शक्ती प्रदर्शनाकडे लक्ष लागले आहे.

नागपुरातील बैठकीनंतर तोडगा नाही

सांगली जिल्ह्यातील युवा नेते विश्वजीत कदम, आमदार विक्रम सावंत आणि पृथ्वीराज पाटील यांनाही नागपूरला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात यांनी तातडीने बैठकीला बोलावले होते. त्या बैठकीनंतर अजून तोडगा निघाला नाही. त्यासंदर्भात निर्णय अद्यापही जाहीर झालेला नाही. आता काँग्रेस नेते विशाल पाटील यांच्या शक्ती




प्रदर्शनात कोण सहभागी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता कोणत्याही परिस्थितीत निवडणूक रिंगणातून माघार न घेण्याचा विशाल पाटील समर्थकांनी निर्धार व्यक्त केला आहे.जयंत पाटील यांनी दिले उत्तर

सांगलीच्या जागेवरून गेल्या काही दिवसांपासून जयंत पाटील यांना सोशल मीडियावर ट्रोल करण्यात येत आहे. यावरून जयंत पाटलांनी जोरदार प्रतिउत्तर दिले आहे. सोशल मीडियावर मला जबाबदार धरले जात आहे. पण त्यांच्या नेत्यांना काय केले, हे बघितले पाहीजे. जे लोक माझ्या बाबत वावडया उठवत आहेत, त्यांनी आत्मचिंतन करावे, असा टोला त्यांनी लगवाला आहे.

# महाराष्ट्रातील या बँकेवर आरबीआयचे निर्बंध, पैसेही काढता येणार नाही:काय असणार पर्याय

गुढीपाडवा या शुभ मुहूर्तावर सहा वर्ष पूर्ण झालेल्या बालकांची शाळेमध्ये प्रवेश निश्चिती करण्यासाठी शासनाने गुढीपाडवा आणि प्रवेश वाढवा.. हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाला राधानगरी तालुक्यात यावेळी ७०.१४ टक्के प्रतिसाद मिळाला आहे. राधानगरी तालुका पंचायत समिती समग्र शिक्षा शिक्षण विभागाच्यावतीने या उपक्रमाला अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला असून उर्वरित ३० टक्के बालकांची देखील पट नोंदणी येत्या काही दिवसांत करून शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण केले जाणार आहे. सर्वेक्षणानुसार राधानगरी तालुक्यात १०२२ मुले, ८८७ मुली अशा १९०९ बालकांची नोंद आहे. भारत वर्षाची सुरुवात हिंदू धर्मात गुढीपाडव्यापासून होत असल्याने याच दिवशी हा दिवस शुभ मानला जात असतो. शासनाने शाळेमध्ये प्रवेश वाढवण्याच्या दृष्टीने नोंदणी करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार राधानगरी




तालुक्यामध्ये ७०१ मुले, ६४६ मुली अशा १३४७ मुलांची शाळा प्रवेशासाठी नोंदणी झाली आहे. ७०.१४ टक्के सरासरी नोंद झाली आहे. कोते केंद्रात ६५, कौलव केंद्र १६०, ठिकपुर्ली १२०, धामोड ७६, पुंगाव १२४, म्हासुर्ली ६८, तळगाव २९, तारळे खुर्द ६५, तुरंबे १११, सरवडे १२४, सावर्डे ३४, सोळांकुर ८५, गुडाळ ७६, दुर्गमानवाड ४०, दूधगंगानगर ३१, फेजिवडे ४६, दाजीपूर ४, राधानगरी ९० अशी केंद्रातून नोंदणी झाली आहे. उर्वरित बालकांची नोंद शंभर टक्के होण्यासाठी शिक्षण अधिकारी दीपक मेंगाने यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी विजय जांगनुरे, ए. जे. कडगावकर, विषयतज्ज अशोक पाटील, प्रदिप पाटील यांच्यासह केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक प्रयत्नशील आहेत.

## आयकॉन क्लासचे उत्तुंग यश! व सीओईपी कॉलेजला झाले विद्यार्थ्यांचे ऍडमिशन



वादळवार्ता/पुणे आयकॉन क्लासेस चा विद्यार्थी साहिल साबळे याचं एमचटी-सीईटी २०२३ मध्ये उत्कृष्ट मार्क्स घेऊन, महाराष्ट्रातील *एक नंबरचं इंजिनीरिंग कॉलेज सीओईपी व एक नंबर ची ब्रँच कॉम्पुटर सायन्सला ऍडमिशन झालं आहे.त्यामुळे, विद्यार्थी साहिल साबळे व त्याचे आई -वडील यांचा शाल, बुके व माऊलींची मूर्ती देऊन आयकॉन क्लासेस चे संचालक प्रा. हरीश जगताप सर व सर्व स्टाफ यांनी सत्कार केला .. यावेळी, साहिल ने व त्याच्या आई-वडिलांनी आयकॉन क्लास मधे एमचटी-सीईटी ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना खुप मोलाचे मार्गदर्शन केले व मुलांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.सातत्य ठेऊन अभ्यास केल्यास तुमचा पण नंबर सीओईपी कॉलेज ला नक्की लागेल असे बोलून साहिल ने आयकॉन मध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला.तसेच, विद्यार्थ्यांचे हित जाणून आयकॉन मध्ये सर्व स्टाफ विद्यार्थ्यांकडून चांगला अभ्यास करून घेतात व विद्यार्थी सर्वगुण संपन्न व्हावा यासाठी आयकॉन मधील सर्व स्टाफ खुप मेहनत घेतात असे मत साहिल च्या पालकांनी मांडले.साहिल ला मिळालेलं हे यश बघुन त्याच्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. साहिल ची आई बोलत असताना सर्वच विद्यार्थी भावुक होऊन त्यांचे विचार ऐकत होते .परिस्थिती अनुकूल असो वा नसो शिक्षण हे घेतलेच पाहिजे. शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व प्रगती अशक्य आहे असे मत प्रा.हरीश सरांनी मांडले. आयकॉन क्लासच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडत असून, यामुळे पुणे जिल्ह्यात आयकॉन क्लासेस चा गौरव होत असल्याचे प्रा. हरीश सरांनी सांगितले. मागील 11 वर्षांपासून आळंदी व आळंदी परिसरात अत्यल्प दरात गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार ज्ञानदानाचं काम आयकॉन क्लासच्या माध्यमातून करत असल्याची माहिती आयकॉन चे संचालक प्रा. हरीश जगताप सर यांनी दिली. तसेच, आयकॉन मध्ये आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी नीट व जेईई परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत फॉउंडेशन घेतले जाते, याची माहिती दिली. मेडिकल व इंजिनीअरिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना करिअर करण्यासाठी आयकॉन मध्ये नीट, एमचटी-सीईटी व जेईई च्या सेपरेट बॅचेस घेत असल्याची माहिती प्रा. हरीश सरांनी दिली. आळंदीमध्ये दर्जेदार लातूर पॅटर्न राबवत असल्याची माहिती प्रा.हरीश सरांनी दिली. तसेच यापुढील काळात पण लातूर पॅटर्न च्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडवण्याचं शैक्षणिक कार्य सुरु राहील असे प्रा. हरीश सर यांनी सत्कार प्रसंगी सांगितले.

# प्रबोधनकार ठाकरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांला सारथी शिष्यवृत्ती

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती एन एम एम एस (NMSS) परीक्षा इयत्ता आठवी चा निकाल जाहीर झाला. यामध्ये सत्यशोधक बहुविध समाजसेवी संस्था कुर्डूवाडी संचलित प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे ता.माढा या विद्यालयातील कु. तुषार दिपक पाटील हा पात्र झाला. त्याने उज्वल यश संपादन केले त्याला सारथी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

सारथी शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी नऊ हजार सहाशे रुपये शासनाकडून मिळतात तसेच सलग पाच वर्षे ही रक्कम प्राप्त होते. ही परीक्षा शासनाच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने इयत्ता आठवीतील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न साडेतीन लाख रुपये पेक्षा कमी असेल त्या मराठा व कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग घेता येतो. परीक्षेमध्ये यश संपादन करण्यामध्ये विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे तसेच विभाग प्रमुख श्री आतकर सर यांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थ्याचे संस्थेचे अध्यक्ष मा.प्रकाश (अण्णा) गोरे संस्थेचे सचिव संजय घाडगे सर मुख्याध्यापक यादव सर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# डॉ.बाबासाहेब यांना जासई हायस्कूल तर्फे अभिवादन.

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज,दहागाव विभाग जासई, ता.उरण जि. रायगड या विद्यालयामार्फत भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव ,विश्वरत्न,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीदिनी अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी विद्यालयाच्या प्रांगणातील डॉक्टर बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन केले. विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी इतर महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका पाटील एस.



एस,रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक, दि.रयत सेवक को-ऑप.बँक सातारा चे मा.व्हाईस चेअरमन नुरा शेख आणि विद्यालयातील सर्व सेवक वर्ग अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.





नेकनूर येथे माजी पंचायत समिती सदस्य पठाण फेरोज खान, व राजा भैय्या ग्रामपंचायत सदस्य व नेकनूर शहेर अध्यक्ष राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्या निवासस्थानी माजी आमदार साठे साहेब यानी ईद-उल-फित्र - रमजान ईद निमित्त भेट दिली व रमजान ईद च्या शुभेच्छा दिल्या यावेळी उपस्थित नेकनूर ग्रामपंचायत सदस्य मुजीब आतार,ग्रामपंचायत सदस्य नदीम मंडोला,ग्रामपंचायत सदस्य सय्यद रिजवान,पठाण जाकेर खान, हाजी सलीम पाशा,काझी रईस बिल्डर,पठाण नासेर खान,पठाण अरबाज खान, पठाण नेहाल खान ,सय्यद साजेद व सर्व राजकीय नेता,सर्व पत्रकार उपस्थित होते,

# केजच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सावळा गोंधळ कार्यालयातील दलालाकडून सामान्याची लूट

**वादळवार्ता/केज** केज शहरातील दुय्यम निबंधक कार्यलयात सावळा गोंधळ सुरु आहे. रजिस्ट्री साठी मूल्य ठरवताना दलालांचे व आतील कर्मचाऱ्यांचे कमिशन ठरलेले असते यामुळे सामान्य माणूस , शेतकऱ्यांची लूट होत आहे कार्यालयातील कर्मचारी मात्र मालामाल होत आहेत .दिवसाकाठी हजारो रुपय वरकमाई कमावणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणाची भीती उरलेली नाही अशा कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून नागरिकांची लूट थांबवावी अशी मागणी जनतेतून होत आहे . तहसील कार्यालयाच्या आवारातील हे दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी विक्री नोंदी विविध अभिलेख तयार केले जातात कोणतेही काम असेल तर अगोदर येथील बाहेर व आत असलेल्या दलालांशी मांडवली करून ठरवले जाते अव्वा च्या सव्वा तोंडी मूल्य सांगून त्यात तडजोड करून हजारो रुपय उकळले जातात तहसीलच्या आवारातील

## याबाबत प्रभारी दुय्यम निबंधक यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

कार्यालयात घडणाऱ्या प्रत्येक घटना डोळ्याला न दिसण्याचा आव आणून स्वताः ची लूट करून घेणारे शिक्षित नागरिक हि याचे बळी ठरत आहेत जनतेची लूट करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई जिल्हाधिकारी करतील काय हाच प्रश्न उपस्थित होत आहे.

दुकान चालवायचे असेल तर दुय्यम निबंधक कार्यालयास हप्ता ठरलेला असतो अशी माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर एकाने दिली कार्यालयातील कामे बाहेर च्या ऑपरेटर कडून करून घेतली जातात अनेकांना तर कमिशनचे पैसे खात्यावर जमा करावयास लावल्याचे प्रकार समोर आले आहेत ,इनामी जमीन सर्वे नंबर न टाकता गोलमाल करून बेकायदा रजिस्ट्री केल्या जात आहेत.मूल्य ठवताना मोठी रक्कम सांगून पुन्हा त्यात कमी करून अनेकांना पावती दिली जात नाही .अनेज नियम पायदळी तुडवून पैसे घेऊन कामे केली जातात मात्र याकडे वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. कार्यालयात जाताना मूल्य ठरवतांना गुत्ते ठरवले जाते खरेदी विक्री करणारे बहुतांशी गरजू लोकं जाऊंद्या म्हणून पैसे हवाली करतात इथे काम करणारे कर्मचारी लाखोंची कमाई करतात सामान्यांना लुटताना त्यांना काहीच वाटत नसावे असे दिसते.




दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )